# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
**E-mail** – nhmgadchiroli2021@gmail.com

**आरोग्य सेवा**

जा.क्र.NHM/आस्था/११२०/२०२६.
कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक ३०/४ /२०२६.

### उमेदवारांकरीता सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच १५ व्या वित्त आयोगांतर्गत विविध कार्यक्रमामध्ये २४ संवर्गातील रिक्त असलेली १७२ पदे भरण्यासाठी भरतीप्रक्रिया सुरु असून प्रसिद्ध जाहिरातीनूसार अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी दिनांक ०३/०२/२०२६ ते १३/०२/२०२६ या कालावधीत करण्यात आलेली आहे. सदर मुळ कागदपत्र पडताळणी अंती संवर्गनिहाय अंतरिम पात्र / अपात्र उमेदवारांची यादी दिनांक १३/०३/२०२६ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन उमेदवारांना काही आक्षेप / हरकती असल्यास दिनांक १६/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधीत आक्षेप अर्ज योग्य त्या पुराव्यासह सादर करण्याबाबत कळविलेले होते. त्यानूसार सदर कालावधीत या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेवून अंतिम पात्र / अपात्र उमेदवारांची यादी व निकाल तयार करण्यात आलेले आहे.

परंतू राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचे स्तरावरुन राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर पदांची पुनर्रचना करण्याची कार्यवाही सुरु असल्याने जाहिरातीमध्ये नमुद रिक्त पदे भरण्याबाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे सदर पदे भरण्यात यावी किंवा कसे? याबाबत मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयाकडून या कार्यालयाच्या दिनांक २०/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. सदर बाबीसंबधाने दिनांक २७/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यस्तरावरुन सुचना प्राप्त झालेल्या असून त्यामध्ये मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे सादर करावयाच्या नस्तीवर HR Rationalisation नूसार जो निर्णय घेण्यात येईल, त्यानूसार जिल्हयांना रिक्त पदांच्या पदभरतीबाबत अवगत करण्यात येईल, असे नमुद केलेले आहे. त्याअनुषंगाने सद्यस्थितीत सुरु असलेल्या पदभरतीस तात्पूरती स्थगिती देण्यात येत आहे.

राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचेकडून निर्णय झाल्यानंतर उमेदवारांकरिता द्यावयाच्या पदभरतीच्या पुढील सुचना जिल्हा परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ www.zpgadchiroli.maharashtra.gov.in यावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्याकरिता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावर जावून माहिती घ्यावी. याबाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविल्या जाणार नाही, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष (निवड समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१

जा क्र. राआस./मनुष्यबळ कक्ष/ पदभरती मार्गदर्शन/ ८९७२-८०५४ /२०२६
दिनांक: २७.०४.२०२६

प्रति,

उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)

विषय- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध स्तरावरील रिक्त असलेल्या पदांची भरतीप्रक्रिया करणेबाबतचे मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ - १.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ यांचे जा.क्र.उपसंआसे/एनएचएम- सीपीएम- कक्ष/ १६८००-१/२६ दि.२७.०३.२०२६ रोजीचे प्राप्त पत्र.
२. जिल्हास्तरावरुन पद भरती करण्यास परवानगी संदर्भातील प्राप्त पत्रे.
३. मा. सहसंचालक (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची मान्य टिपणी.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये पत्रे या कार्यालयास प्राप्त झालेली असुन सदरील पत्रांमध्ये नमुद विषयानुसार विविध स्तरावर कार्यक्रमांच्या अंमलबजावणीकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२५-२६ च्या मंजुर पीआयपीनुसार मंजुर मनुष्यबळापैकी सद्यस्थितीत रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रिया करणेबाबत स्थानिक पातळीवर संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचे मार्फत निर्देशित करण्यात आल्याने सदरील पद भरतीबाबत मार्गदर्शन करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सद्यस्थितीत जिल्हास्तरावरुन मोठ्याप्रमाणात जाहिराती प्रकाशित करण्यात आलेल्या असुन विभाग/जिल्हा/मनपा स्तरावर रिक्त पदांची पदभरतीची प्रक्रिया या कार्यालयाच्या व्हि.सी. बैठकिदरम्यान दिलेल्या मौखीक सुचनांनुसार स्थगीत करण्यात आलेली दिसुन येत आहे. तसेच जिल्हा कार्यालयाकडून पदभरती प्रक्रिया पुढे चालू ठेवावी किंवा स्थगीत करावी याबाबत लेखी आदेश देण्याची विनंती वारंवार लेखी व दुरध्वनीव्दारे विचारणा करण्यात येत असून या संदर्भात या कार्यालयामार्फत कोणतेही लेखी निर्देश अद्यापपर्यंत निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

करिता आपणास कळविण्यात येते की, सद्यस्थितीत जिल्हास्तरावरुन मोठ्याप्रमाणात जाहिराती प्रकाशित करण्यात आलेल्या असुन विभाग/जिल्हा/मनपा स्तरावर रिक्त पदांची पदभरती मार्गदर्शनकरिता स्वतंत्र नस्ती प्रस्तावित करण्यात आलेली होती. सदर नस्तीवर मा.अभियान संचालक, रा.आ.अभियान,मुंबई यांनी HR Rationalization बाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे HR Rationalization बाबतची पूर्तता करुन सदर नस्तीवर जो निर्णय घेण्यात येईल त्यानुसार जिल्हयांना रिक्त पदांची पदभरती संदर्भात अवगत करण्यात येईल.

(राजेंद्र बी.भालेराव)
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई

प्रत-१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)